**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २१६ ।। शुक्रवार २२ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# ‘नो व्हेईकल डे’ला उत्स्फूर्त प्रतिसाद सायकलवर व पायी आले अधिकारी

## अहिल्यानगरात हरित संकल्प मोहिमेला दमदार सुरुवात इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि आरोग्याचा संदेश







**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत व पर्यावरण संरक्षणाच्या आवाहनाला तसेच राज्य शासनाच्या हरित उपक्रमांना प्रतिसाद देत अहिल्यानगर जिल्ह्यात शुक्रवारी ‘‘नो व्हेईकल डे’’ उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयासह विविध शासकीय कार्यालयांच्या परिसरात वाहनांची संख्या लक्षणीयरीत्या कमी दिसून आली. अनेक अधिकारी व कर्मचारी सायकल, इलेक्ट्रिक वाहन, सार्वजनिक वाहतूक तसेच पायी कार्यालयात पोहोचले.

विशेष म्हणजे निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते,जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक सुरेश आघाव यांनी स्वतः सायकलवरून कार्यालयात येत तसेच उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, गौरी सावंत, तहसीलदार शोभा पुजारी, तहसीलदार संचेती यांनी पब्लिक ट्रान्सपोर्ट चा वापर करून नंतर कार्यालयात पायी चालत येत उपक्रमात सहभाग नोंदविला. त्यांच्या या कृतीमुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यालयात सायकल, इलेक्ट्रिक बाइक व पायी येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र राज्य शाखा अहिल्यानगर तसेच महसूल संघटनेच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. ‘‘उद्या आपली गाडी घरीच थांबणार’’ हा निर्धार करत

पान ४ वर

# केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री फडणवीस उद्या कोपरगावात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी एमआयडीसी येथे मे. ग्लोब फोर्ब्स लिमिटेड कंपनीच्या उदघाटन कार्यक्रमासाठी केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उद्या, शनिवार दिनांक २३ मे रोजी कोपरगाव येथे येणार आहेत. यावेळी ते शिर्डीतील साईबाबा समाधीचे दर्शन घेणार आहेत. या कार्यक्रमास विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संरक्षणमंत्री, मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नगर-मनमाड रस्त्यावरील वाहतुकीत बदल केला आहे.

### वाहतूक मार्गात बदल

या दौ-याच्या पार्श्वभूमीवर नगर-मनमाड रस्त्यावरील अवजड वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. सध्या या महामार्गावरील सावळी विहीर (ता. राहाता) या गावामध्ये ओव्हरब्रिज तसेच रोड दुरुस्तीचे काम चालू असल्याने दौऱ्यावेळी वाहतुकीस अडथळा होऊन कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून सदर मार्गावरील अवजड वाहतूक दिनांक २३ रोजी सकाळी सहा ते रात्री अकरा वाजेपर्यंत पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.

१) अहिल्यानगरकडून राहुरी, शिर्डी, मनमाड, मालेगाव, धुळेकडे जाणारी वाहने विळद सर्कल - दूध डेअरी चौक-शेंडी बायपास-नेवासा फाटा-कायगाव टोका-गंगापूर-वैजापूर मार्गे इच्छितस्थळी जातील. २) मनमाडकडून कोपरगाव, शिर्डी, राहुरी मार्गे अहिल्यानगरकडे येणारी वाहने पुणतांबा-झगडे फाटा-तळेगांव दिघे-लोणी कोल्हार-राहुरी मार्गे इच्छित स्थळी जातील.रुग्णवाहिका, अग्निशमन व परवानगी दिलेल्या इतर वाहनांना हा नियम लागू राहणार नाही.

### राहाता व कोपरगाव तालुक्यात दोन दिवस नो फ्लाय झोन घोषित


केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौ-याच्या पार्श्वभूमीवर राहाता व कोपरगाव तालुक्यात दि. २२ मे रोजी सकाळी १० वाजेपासून दि. २३ मे २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण राहाता व कोपरगाव तालुक्यात नो फ्लाय झोन (ड्रोन उडविण्यावर बंदी) घोषित केला आहे. अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) नुसार हा आदेश दिला असून, आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ तसेच इतर लागू असलेल्या कायद्यांन्वये कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# दुचाकीस्वार तरुणीचा पाठलाग करून विनयभंग करणारा जेरबंद

## सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर १२ तासांत आरोपीला बेड्या

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दुचाकीवर रात्रीच्या सुमारास घरी येत असलेल्या तरुणीचा पाठलाग करून विनयभंग करणाऱ्या आरोपीस स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने बारा तासांत जेरबंद केले आहे. बंटी उर्फ संकेत ससाणे (रा. सिध्दार्थनगर) असे त्याचे नाव आहे. या तरुणीने आपल्याबाबत झालेल्या प्रकाराचा



व्हिडिओ तयार करून सोशल मीडियावर व्हायरल केला होता व आरोपीला कोणी ओळखत असल्यास पान ४ वर

### महिलांच्या बाबतीत झिरो टॉलरन्स धोरण

अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल महिलांच्या सुरक्षेबाबत ‘‘झिरो टॉलरन्स’’ धोरण राबवत आहे. महिलांनी अशा घटनांची माहिती तत्काळ ११२ या नंबरवर फोन करुन द्यावी. असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

# संगमनेरमध्ये अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संगमनेर तालुक्यातील खांडगाव येथे वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरूध्द स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने कारवाई करून ३ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक २० रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संगमनेर शहर हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, शरद कारभारी गुंजाळ (रा.खांडगाव ता.संगमनेर) हा त्याच्या हस्तकामार्फत नाशिक रोडकडे जाणा-या सर्व्हिस रोडने खांडगाव शिवारातून अवैधरित्या पिकअपमध्ये वाळूची चोरुन वाहतूक करत आहे.

पथकाने तात्काळ खाडगाव



खांडगाव शिवारात सापळा रचून संशयित पिकअप थांबवली. चालक शुभम संजय जेडगुले (वय-२५ वर्षे रा. वेल्हाळे ता.संगमनेर) याने पिकअप मालकाचे नाव शरद कारभारी गुंजाळ (रा.खांडगाव ता.संगमनेर) असे असल्याचे सांगितले.

आरोपीच्या कब्जातूनन १० हजार रुपये किमतीची एक ब्रास वाळू व ३ लाख रुपये किमतीचा पिकअप असा एकूण ३ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुध्द संगमनेर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच पथकातील उपनिरीक्षक महादेव गुट्टे, अंमलदार विजय पावर, अमृत आढाव, योगेश कर्डिले, चालक उत्तरेश्वर मोराळे यांनी केली.

# जनतेच्या प्रश्नांवर आमदार काशिनाथ दाते सरांचा थेट दरबार

## १०० हून अधिक नागरिकांना दिलासा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील नागरिकांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी पुन्हा एकदा पुढाकार घेत जनसंपर्क कार्यालयात विशेष बैठकीचे आयोजन केले. पारनेर येथील जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या बैठकीत भूमी अभिलेख विभागातील अधिकाऱ्यांसोबत नागरिकांच्या विविध समस्या, तक्रारी आणि प्रलंबित कामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस उपअधीक्षक भूमी अभिलेख जितेंद्र भिंगारदिवे, शिरस्तेदार विजय हरीषचंद्रे, परिरक्षण भूमापक प्रशांत शिंदे तसेच कनिष्ठ लिपिक दुर्गेश सोनार उपस्थित होते. आमदार दाते सरांच्या उपस्थितीत नागरिकांच्या अडचणी संयमाने ऐकून घेण्यात आल्या. विशेष म्हणजे, मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित असूनही आमदार दाते सरांनी प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र वेळ देत त्यांच्या समस्या समजून घेतल्या. संबंधित अधिकाऱ्यांसमोर तातडीने विषय मांडून पर्याय आणि उपाययोजनांवर भर देण्यात आला. त्यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

तालुक्यातील १०० हून अधिक नागरिकांनी जमीन मोजणी, सिटी सर्व्हे, नोंदीतील त्रुटी, प्रलंबित कामे तसेच विविध प्रशासकीय अडचणींबाबत आपली मते मांडली. यावेळी आमदार दाते सरांनी संबंधित अधिकाऱ्यांना नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीने आणि कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे स्पष्ट निर्देश दिले. ‘‘सामान्य नागरिकांना प्रशासनाच्या दारात हेलपाटे मारावे लागू नयेत, त्यांच्या समस्या वेळेत मार्गी लागाव्यात यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत,’’ अशी भूमिका आमदार दाते सरांनी यावेळी मांडली. जनतेच्या प्रश्नांबाबत सातत्याने पाठपुरावा करून प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर प्रभावीपणे कार्यरत असल्याचे या बैठकीत अधोरेखित झाले.

# कत्तलीसाठी चालविलेल्या चार गोवंशीय जनावरांची सुटका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संगमनेर येथे कत्तल करण्यासाठी चालविलेल्या चार गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने सुटका केली आहे. या कारवाईत सुमारे साडेसह लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २२ रोजी पहाटे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संगमनेर तालुका हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असताना कलीम चांद कुरेशी (रा. मोगलपुरा संगमनेर) हा त्याच्या हस्तकामार्फत पिकअप टेम्पोमध्ये गोवंशीय जातीची जनावरे कत्तल करण्यासाठी कोतुळ (ता. अकोले) येथून भरुन ते निमगावपागा, धांदरफळ खुर्द मार्गे संगमनेर येथे आणणार असल्याची माहिती प्राप्त झाली.

पथकाने तात्काळ संगमनेर ते निमगाव पागा रोडवर धांदरफळ खुर्द येथे सापळा रचून संशयित पिकअपची तपासणी केली असता त्यात कत्तलीसाठी चालविलेली चार गोवंशीय जनावरे आढळून आली. वाहनातील अमित बाळासाहेब पवार (वय-३० वर्षे रा. कोतुळ ता. अकोले), हौसिराम वामन खरात (वय-५० वर्षे रा. कोतुळ ता. अकोले) या दोघांकडे चौकशी करता त्यांनी ही जनावरे अन्वर बाबू तांबोळी (रा. कोतुळ ता. अकोले), फैजू नसरुद्दीन काझी (रा. मोगलपुरा संगमनेर), कलीम चाँद कुरेशी (रा. मोगलपुरा संगमनेर) व बाबा अशरफ कुरेशी (रा. भारतनगर संगमनेर) यांची असल्याचे सांगितले.

पथकाने आरोपींकडून १ लाख १५ हजार रुपये किमतीचे ४ जिवंत गोवंशीय जनावरे, पाच लाखांचे पिकअप वाहन व ३० हजार रुपयांचे दोन मोबाईल असा एकूण ६ लाख ४५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुध्द संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५(ब), ५(क), ९ सह प्राण्यांना निर्दयतेने वागविण्याचे कलम ३, ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दै. आकर्षण निवडक

### सामाजिक कार्यकर्ते डोंगरे व शिक्षिका सीमा गायकवाड यांना 'महाराष्ट्र नायक' राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**अहिल्यानगर - बी.एस.एफ. बहुद्देशीय संस्था व सत् कबीर बहुद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे आणि उपक्रमशील शिक्षिका सीमा रामराव गायकवाड यांना ''महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार'' जाहीर करण्यात आला आहे. येत्या ३१ मे रोजी नाशिक रोड येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात येणार असल्याची माहिती मुख्य आयोजक भूषण सरदार यांनी दिली. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिमा, स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांनी समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांचे आयोजन करून ग्रामीण नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे कार्यही सातत्याने सुरू आहे.महिला बचत गट मेळावे, युवा संमेलने, विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनातून ग्रामीण समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. साहित्य क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. ग्रामीण भागातील नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच चार ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. दरम्यान, सीमा रामराव गायकवाड या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धामणी, ता. मानोरा (जि. वाशिम) येथे शिक्षिका म्हणून कार्यरत असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी त्या सातत्याने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. विद्यार्थ्यांना आधुनिक व डिजिटल पद्धतीने शिक्षण मिळावे यासाठी त्या विशेष प्रयत्नशील आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी नवोदय परीक्षेत यश संपादन केले असून विविध शैक्षणिक उपक्रमांमध्येही विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.उपक्रमशील शिक्षिका म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली असून सामाजिक कार्यातही त्यांचे योगदान सुरु आहे. शिक्षण आणि समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांनाही ''महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार'' जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पै. नाना डोंगरे आणि सीमा गायकवाड यांचे अभिनंदन होत आहे.**

## श्री ढोकेश्वर विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज अंतर्गत, कार्यरत श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने इयत्ता ५ वी व ८ वी शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ६२ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल २५ विद्यार्थी पात्र ठरले असून, विद्यालयाचा निकाल ४०.३२ टक्के लागला आहे. या परीक्षेत चि. यश संदिप माकरे याने (२२८) गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच द्वितीय क्र. कु.भक्ती सचिन खैरे (१९२), तृतीय क्र. चि. रोहित सुमित कटारिया (१८०), तर इयत्ता ८ वी शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये एकूण ३८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी १० विद्यार्थी पात्र ठरले असून विद्यालयाचा निकाल २६.३१ टक्के लागला आहे. चि. साई दत्तात्रय चिकणे याने २१८ गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला. तसेच द्वितीय क्र. कु. अथश्री अजय ठुबे (२१६), तृतीय क्र. चि. आराध्य शंकर पावडे (१९०), गुण मिळवून यश संपादन केले.

या विद्यार्थ्यांना इ. पाचवी साठी श्री. मल्हारी वाघस्कर, श्री. बाबासाहेब जाधव, श्री. अतुल सैद, श्रीम. सुमन वाळुंज, श्रीम. मिनाक्षी पवार यांचे मार्गदर्शन मिळाले. तर इयत्ता आठवी साठी श्रीम. कल्पना जाधव, श्रीम. वैशाली गायखे, श्रीम. सुरेखा ठाणगे, श्रीम. सोनाली माळवदे यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सन्माननीय श्री. सितारामजी खिलारी पा. तथा अण्णा व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी पा., विद्यालयाचे प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षिका श्रीम. मनिषा गाडगे, श्री. बबनराव पायमोडे सर, ॲड. बाबासाहेब खिलारी पा., शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. लहूशेठ जाधव, उपाध्यक्ष श्री.अविनाश भालके, श्री. नारायण झावरे साहेब, श्री. प्रकाशराव इघे सर, श्री. बबनराव गायखे सर, श्री. बापूसाहेब रांधवन सर, विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, ग्रामस्त तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेमुळे परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत शहरटाकळी विद्यालयाचे घवघवीत यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयाने या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.

इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी एकूण ६० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.त्यामध्ये संस्कार सुयोग बनकर २२६,धनंजय भागचंद काटे २१६,सिध्दार्थ संतोष पवार २१४,निखिल गोरखनाथ पवार २०६,अवनी रामदास काळे १८०,प्रतिक दिपक मांढरे १७८,आदित्य अंकुश कोल्हे १७४,मृणाली नितीन वाघ १७२,युवराज अंकुश नवले १७२,आदर्श मनोजकुमार खराडे १७०, श्रुती सोमनाथ सामृत १७०,साई जालिंदर घुले १६०,प्रिया वाल्मिक घुणे १५८,रितिशा अशोक निमसे १५८, विद्या अर्जुन मांढरे १५४,सत्यम दिपक मरकड १५२,पार्थ प्रदीप पवार १४८,अस्मिता रामेश्वर ठोंबळ १४६,अनुष्का अनिल शेळके १४४,शिवम माधव चव्हाण १४४,श्रेया श्रीराम चोपडे १४४,सोहम भाऊसाहेब गाडेकर १४०,समृद्धी तुळशीराम रौंदाळे १३४,साई किशोर काळे १३०

तर इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी एकूण ५६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये वेदिका रामेश्वर गुंड २२४,साई संतोष शेळके २१२,नलिनी विजय कावले २०६,माहेश्वरी रविंद्र मुके २०४,मानसी संजय निकम २०४,साई बाबासाहेब शेळके २०२,प्रिती मोहन कोल्हे २००,संध्या संजय दळवी १९८,ओम चंद्रकांत जरे १९६,प्रतीक्षा संतोष आजबे १९६,श्रद्धा राहुल कानडे १९६,वैष्णवी महेश भूमकर १९४,सार्थक विलास गुळमकर १९४,गुंजन संतोष हत्ते १९२,सार्थक रविंद्र बांगर १९२, ऋतुजा सुनिल वाघ १९०,श्रेया संतोष मोरे १९०,साई गणेश कणके १८८,मंजिरी भागवत काळे १८६,कृष्णा शेषराव झेंड १८२,समृद्धी देविदास टाक १८२,संध्या राम नवले १८२,श्रावणी अर्जुन मांढरे १८२,आनंदी देविदास वैद्य १८०,जिविका देविदास चव्हाण १८०,विराट गणेश वडघणे १८०,शिवम शिवाजी खराडे १७४,गायत्री रविंद्र पवार १७२ओम संतोष शेळके १७२,विद्या ज्ञानेश्वर पवार १७०, यश सुभाष वाघमारे १७०, अथर्व नवनाथ मगर १६८ श्रावणी सोमनाथ सामृत१६८,श्रुती कैलास गिरम १६८,अक्षरा सचिन खंडागळे १६६,संध्या विनोद शेटे १६२,तनुजा कृष्णा कावळे १६२,प्रांजल संतोष पंडीत १६०,सोहम दत्तात्रय म्हस्के १६०,हर्षद बापूसाहेब पवार १५८,साईदीप बाळासाहेब बोरकर १५६,सिद्धार्थ दत्तात्रय मोरे १५६,चैतन्य शिवाजी खरड १५४,विवेक राजेंद्र तासतोडे १५४,नैतिक नानासाहेब काळे १४८,मोमिना जावेद शेख १४६,सौरभ गणेश ठोंबळ १४४,आयान निजाम शेख १३८ या गुणवंत विद्यार्थ्यांना इयत्ता ५वी साठी सहशिक्षक किरण कुढेकर, अमोल गाडगे, शशिकांत सूर्यवंशी, सोनाली सुसे यांचे तर इयत्ता ८ वी साठी अनिता दारकुंडे,शशिकांत काकडे, आशा कानडे, आदिनाथ काटे या शिक्षकांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

या सर्व गुणवंतांचे व त्यांना अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड.डॉ.विद्याधरजी काकडे,जि.प.सदस्या सौ. हर्षदाताई काकडे,संस्थेचे विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.डॉ.लक्ष्मणराव बिटाळ, शैक्षणिक विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख प्रा.अशोक आहेर, विद्यालयाचे माजी प्राचार्य कांतेश्वर ढोले,प्रभारी प्राचार्य सुनिल जायभाये, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## गंगागिरी महाराजांच्या सप्ताहासाठी रस्ते तातडीने दुरुस्त करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथे ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या गंगागिरी महाराजांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी राज्यभरातून जवळपास एक कोटी भाविक उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर धनगरवाडी गावाला जोडणाऱ्या सर्व प्रमुख रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीच्या सोयीसाठी तातडीने रस्त्यांची दुरुस्ती व नव्याने बांधकाम करण्यात यावे, अशी जोरदार मागणी शिवसेना युवा नेते अभिजीत पोटे यांनी केली आहे.

झालेल्या रस्ता सुरक्षा समिती बैठकीत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अद्याप ठोस

दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी उपाययोजना झालेली नसल्याचे नमूद करत, २१ मे २०२६ रोजी दुपारी ३ वाजता होणाऱ्या ऑनलाईन रस्ता सुरक्षा समिती बैठकीमध्ये



त्यांच्या निवेदनातील प्रश्नांचा समावेश करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

अभिजीत पोटे यांनी दिलेल्या निवेदनानुसार धनगरवाडी परिसरातील अनेक महत्त्वाचे रस्ते अतिशय खराब अवस्थेत आहेत. पुणतांबा–जळगाव - वाकडी - दिघी या मार्गावरील सुमारे २५ किलोमीटरचा प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील रस्ता नव्याने करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गणेशनगर फाटा ते वाकडी टर्निंग पॉईट दरम्यानचा २ किलोमीटर जिल्हा परिषद रस्ता देखील पूर्णतः खराब झाल्याने त्याचे तातडीने नूतनीकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

श्रीरामपूर एमआयडीसी ते धनगरवाडी दरम्यानचा ७०० मीटरचा रस्ता जड वाहतुकीमुळे पूर्णपणे खराब झाला असून, एमआयडीसीतील अवजड वाहनांची क्षमता लक्षात घेऊन मजबूत डिझाईनचा नवीन रस्ता उभारण्यात यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय धनगरवाडी रेल्वे अंडरपासमार्गे गावापर्यंतचा सुमारे ४ किलोमीटरचा रस्ता नव्याने तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मराठवाड्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणारा खैरी ते नाऊर आणि पुढे श्रीरामपूर गोवर्धन मार्गे सराला बेटाला जोडणारा एकूण १२ किलोमीटरचा रस्ता देखील अत्यंत खराब अवस्थेत असल्याचे पोटे यांनी निदर्शनास आणून दिले. हा रस्ता नव्याने झाल्यास मराठवाडा आणि धनगरवाडी यांतील संपर्क वाढून प्रवासाचा वेळ केवळ ३० मिनिटांवर येईल. तसेच समृद्धी महामार्गालाही या मार्गाचा मोठा फायदा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## चांगतपुरीच्या प्रीती खाडे यांची सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी निवड

### पैठण तालुक्यातील पहिल्या महिला एपीआय होण्याचा मान; तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** पैठण तालुक्यातील चांगतपुरी येथील सौ. प्रीती गणेश खाडे यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी निवड झाल्याने तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. पैठण तालुक्यातील पहिल्या महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक होण्याचा मान त्यांनी मिळविल्याने सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

सौ. खाडे यांनी यापूर्वी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात कार्यरत असताना उत्कृष्ट व कर्तव्यदक्ष कामगिरी करत आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. शिस्तबद्ध कार्यपद्धती, जनसामान्यांशी असलेला सुसंवाद आणि प्रामाणिक सेवेमुळे त्यांनी पोलीस खात्यात विशेष छाप पाडली आहे.

त्यांच्या या यशामुळे पैठण तालुक्याची मान उंचावली असून, चांगतपुरी ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करत त्यांचा सत्कार करण्याची तयारी सुरू केली आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थांकडून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.''त्यांच्या कार्याला सलाम,'' अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

## कौटुंबिक वादाच्या सुनावणीसाठी नगरमध्ये आलेल्या व्यक्तीवर जीवघेणा हल्ला

### आरोपी मोकाट फिरत असल्याने जीवाला धोका



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** न्यायप्रविष्ट असलेल्या कौटुंबिक वादाच्या न्यायालयीन कामासाठी अहिल्यानगर शहरात आलेल्या वाशी, नवी मुंबई येथील अजीज अहमद बेग खान यांच्यावर कथितरीत्या जीवघेणा हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, अन्यथा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा अजीज खान यांनी दिला आहे. याबाबत त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी त्यांनी केली आहे.

अजीज अहमद बेग खान यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांची सासरवाडी अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर परिसरात असून, कौटुंबिक वादासंदर्भातील प्रकरण सध्या नगर न्यायालयात सुरू आहे. संबंधित प्रकरणाच्या सुनावणीसाठी ते नगरमध्ये आले असताना त्यांच्यावर काही व्यक्तींनी अचानक हल्ला करून गंभीर मारहाण केली. या मारहाणीत त्यांच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत होऊन हात फ्रॅक्चर झाला असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

या घटनेप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम ११८ (२), ११८ (१), ११५ (२), ३५१ (२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊनही मुख्य आरोपी हुसेन खान, आजम खान व इतर संबंधित आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप अजीज खान यांनी केला आहे. आरोपी खुलेआम फिरत असून त्यांच्याकडून जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. पोलिसांनी योग्य ती कार्यवाही न केल्यास जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा अजीज अहमद बेग खान यांनी दिला आहे.

## दोन वर्षांपासून रखडलेल्या कोल्हार उदरमल घाटाच्या कामावर संताप


### कामातील दिरंगाईची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जेऊर-पाथर्डी मार्गावरील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या कोल्हार उदरमल घाटाच्या दोन वर्षापासून रखडलेल्या कामामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. हे काम अपूर्ण अवस्थेत पडून असल्याने वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, संबंधित काम तातडीने सुरू करून पूर्ण करण्यात यावे तसेच कामातील दिरंगाईची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर व संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन जय हिंद फाऊंडेशनचे शिवाजी पालवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना पाठविले आहे. हे निवेदन जेऊर पंचक्रोशी तसेच चिचोंडी पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आले असून, रखडलेल्या कामामुळे नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जेऊरवरून पाथर्डीकडे जाताना लागणारा कोल्हार उदरमल घाट हा परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्याच्या कामास सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांच्या माध्यमातून सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली होती. ''अहिल्यानगर-बुन्हानगर-आगडगाव-कोल्हार रस्ता प्रजिमा ४९'' अंतर्गत किलोमीटर १५/००



ते १८/०० या टप्प्यासाठी ३५० लाख रुपये आणि किलोमीटर १८/०० ते २१/५०० या टप्प्यासाठी ३५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

या कामाचे भूमिपूजन ९ मार्च २०२४ रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आले. भूमिपूजनानंतर काही प्रमाणात काम सुरू झाले; मात्र काही दिवसांतच काम अचानक बंद पडले. परिणामी घाटातील रस्ता अत्यंत खराब झाला असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. खराब रस्त्यामुळे अपघातांची शक्यता वाढली असून, नागरिकांना मोठ्या प्रमाणावर मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

दरम्यान, या रखडलेल्या कामाबाबत जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रशासनाकडे निवेदन देत तातडीने काम सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यावेळी काम सुरू न झाल्यास परिसरातील सर्व गावांच्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला होता. त्यानंतर प्रशासनाच्या माध्यमातून २५ फेब्रुवारी २०२५ रोजी आंदोलन स्थगित करण्याची विनंती करण्यात आली. घाटातील खड्डे तातडीने बुजवले जातील तसेच पावसाळ्यापूर्वी डांबरीकरणासह संपूर्ण घाटाचे काम पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले होते.

प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले आणि काही प्रमाणात खड्डे बुजवण्याचे काम करण्यात आले. मात्र, पावसाळ्यापूर्वी संपूर्ण काम पूर्ण करण्याचे आश्वासन हवेतच विरले. आजही घाटातील अनेक भाग अपूर्ण असून, रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण झालेले नाही. नियमानुसार साइड पट्टी तयार करण्यात आलेली नाही. अनेक ठिकाणी अद्याप खडीकरणही झालेले नाही. तब्बल दोन वर्षे दोन महिने उलटूनही काम पूर्ण न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्यात यावी, कामाच्या दर्जाची तपासणी करण्यात यावी तसेच वेळेत काम पूर्ण न करणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच शासनाने तातडीने आदेश देऊन कोल्हार उदरमल घाटाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याची मागणी जय हिंद फाऊंडेशन व पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### राजेश चौरे यांच्या जिद्द पेरतांना कादंबरीला शिवबाबा वाघ प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार जाहीर



अहिल्यानगर- शिवबाबा वाघ प्रतिष्ठान (पिंपळगाव जलाल,ता. येवला,जि.नाशिक) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शहादू शिवाजी वाघ स्मृती राज्यस्तरीय पाचव्या साहित्य कलाकृती पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे.यावर्षीचा अत्यंत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार चांदा (जि.अहिल्यानगर)येथील प्रथितयश लेखक राजेश चांगदेव चौरे यांच्या जिद्द पेरतांनाया कादंबरीला जाहीर झाला आहे.शिवबाबा वाघ प्रतिष्ठानच्या वतीने दि.१ मे २०२६ रोजी या पुरस्कारांची अधिकृत घोषणा करण्यात आली.या राज्यस्तरीय स्पर्धे साठी जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालखंडात प्रकाशित झालेल्या एकूण २२ उत्कृष्ट कादंबऱ्या प्रतिष्ठानकडे प्राप्त झाल्या होत्या.या सर्व कादंबऱ्यांमधून परीक्षकांनी सखोल मूल्यमापन करून लेखक राजेश चौरे यांच्या जिद्द पेरतांना या कलाकृतीची प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारासाठी एकमताने निवड केली. कादंबरीचे परीक्षण मा.प्रा.डॉ. आर आर जे इंगोले चांदवड (नाशिक) यांनी केले होते. तसेच या कादंबरीला भारत सन्मान २०२६ व अक्षर सागर साहित्य मंच गारगोटीचा राज्यस्तरीय उत्कृष्ट कादंबरी पुरस्काराने देखील गौरवण्यात आले आहे.उत्कृष्ट साहित्यकृतींची निवड झाल्याबद्दल साहित्य वर्तुळातून राजेश चौरे यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

### तीन दिवसीय निवासी लघुपट कार्यशाळेचे आयोजन

अहिल्यानगर- डी एल फिल्म प्रॉडक्शन्स हाऊस आणि समाज परिवर्तन संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय निवासी व अनिवासी लघुपट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दि. २९ ते ३१ मे २०२६ दरम्यान बॉस्को ग्रामीण विकास केंद्र, केडगाव येथे सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणार आहे. या कार्यशाळेत लघुपट निर्मिती तंत्रज्ञान, लघुपट स्क्रिप्ट लेखन, व्हिडिओग्राफी तंत्रज्ञान, अभिनय तंत्रज्ञान तसेच फिल्म एडिटिंग तंत्रज्ञान याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. चित्रपट, लघुपट आणि डिजिटल माध्यम क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.कार्यशाळा निवासी तसेच अनिवासी स्वरूपात आयोजित करण्यात आली असून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर केवळ १० जागांसाठी प्रवेश दिला जाणार आहे. इच्छुकांनी आपली नोंदणी २५ मे २०२६ पूर्वी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी ९४२२०१७९५० / ९८२२२८४८५४ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच २२. या ई-मेलवरही संपर्क करता येणार आहे.

### चिखली वाचनालय प्रकरणात सरपंचासह संबंधितांवर शिस्तभंग कारवाईचे आदेश

अहिल्यानगर- श्रीगोंदा तालुक्यातील मौजे चिखली येथील सार्वजनिक वाचनालय पाडल्याप्रकरणी आता संबंधितांवर कारवाईची प्रक्रिया वेगाने सुरू झाली असून, जिल्हा परिषद प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. जिल्हास्तरीय त्रिस्तरीय चौकशी समितीच्या अहवालात सरपंच व ग्रामसेवक दोषी आढळून आल्याने त्यांच्यासह संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निर्देशानुसार देण्यात आले आहेत.माजी सैनिक महेश भिवसेन झेंडे यांनी आपले सरकार पोर्टलवर तक्रार दाखल केल्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यात आली होती. चौकशीदरम्यान खासदार निधीतून उभारण्यात आलेली सार्वजनिक वाचनालयाची इमारत आवश्यक निर्लेखन मंजुरी मिळण्यापूर्वीच पाडण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आल्याची माहिती मिळाली आहे.या प्रकरणी जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर चौकशी अहवाल मागवला होता.

# स्व.चंपालाल मुथा यांनी सामाजिक कार्याचा आदर्श निर्माण केला - इंदरलाल मुथा

## जैन वात्सल्य संस्थेच्यावतीने गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा भेट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– भारतीय संस्कृतीत समाजऋणातून उतराई होण्यास खूप महत्त्व आहे. कारण मनुष्य हा समाजामुळेच प्रगती करतो असे मानले जाते. यासाठी समाजातील गरजूंना स्वाभिमानाने जगण्यासाठी आधार देणे आवश्यक ठरते. साधूसंत नेहमीच दिनदुबळ्यांची सेवा करण्याची शिकवण देतात. वंचित , गरजू लोकांना केलेली मदत मोठे पुण्य कर्म असते. आमचे मोठे बंधू चंपालालजी मुथा यांनी व्यवसाय करतानाच कायम निरपेक्ष भावनेने समाजासाठी कार्य केले. धार्मिक कार्यात योगदान दिले तसेच समाजातील गरजूंना मदत करण्यासाठी सातत्याने योगदान दिले. जैन वात्सल्य संस्थेच्या कार्यात त्यांचा कायम सहभाग होता. सामाजिक कार्याचा आदर्श त्यांनी निर्माण केला. समाजासाठी योगदान देण्याचा वैचारिक वारसा त्यांनी आपल्या पुढच्या पिढीला दिला आहे, असे प्रतिपादन इंदरलाल मुथा यांनी केले.

श्री जैन ओसवाल वात्सल्य संस्थेच्या वतीने दर महिन्याला समाजातील गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा भेट देण्यात येतो. या महिन्यात चंपालालजी मुथा (ओडणावाला) यांच्या स्मरणार्थ मुथा परीवाराच्या वतीने ( वर्धमान ) ही मदत करण्यात आली. धार्मिक परीक्षा बोर्ड समोरील सचिन अशोक कोठारी यांच्या बंगल्यावर गरजूंना अन्नधान्य व किराणा वाटप करण्यात आले. यावेळी कांतीलाल फिरोदिया, मनोरमा फिरोदिया, अरूणा मुथा, इंदरलाल मुथा, भारती मुथा, विजय मुथा, ज्योती मुथा, वर्धमान मुथा, अश्विनी मुथा, पियुष मुथा, निशा मुथा, दीपेश, अंशु, कविशा मुथा, संस्थेचे सेक्रेटरी विजय गुगळे आदी उपस्थित होते.

अश्विनी मुथा म्हणाल्या की, आपल्या कमाईने आपण कुटुंबासाठी सतत चांगल्या गोष्टी करत असतो. हे आपण कर्तव्य मानतो. त्याच प्रमाणे आपण आपल्या कमाईचा काही भाग समाजातील गरजूंसाठीही वापरला पाहिजे. अशा गरजूंना मदत केल्याने मानसिक समाधान मिळतेच याशिवाय परमेश्वर आपल्यावर कायम कृपादृष्टी ठेवतो. मुथा परिवाराने कायम समाजासाठी योगदान दिले असून चंपालालजी मुथा यांचे हे सामाजिक कार्य पुढेही चालूच ठेवण्याचा प्रयत्न राहील.

या सामाजिक उपक्रमासाठी सौरभ व श्रीमती प्रमिलाबाई बोरा, विजय मुथा ( वर्धमान ), अशोक ( बाबुशेठ ) गौतम बोरा ( एस.के. ज्वेलर्स), चंद्रकांत आशिषकुमार मुथ्था, ( वांबोरीवाला ) इंडीया केम वाला, तप आराधिका सोनल पारस चोरडिया (एन. सुमतीलाल ), संतोष राजेश भंडारी ( महावीर कन्स्ट्रक्शन , टाकळी ढोकेश्वरवाला ), योगेश प्रकाश बजाज, अहिल्यानगर, पुणे, अशोक अभय गांधी ( रामलाल लालचंद ), अजित विजय बोरा, पिंपळगाव माळवीवाला, संतोष पनालाल बोगावत ( सतिश शरद ), अजय अतुल बोरा (व्हीआरबी ज्वेलर्स ), ॲड. विकी दिलीप मुथा, सतिष विक्रम मुथा ( मुथा कलेक्शन ), किशोर कुणाल गुगळे (कीर्ति कलेक्शन) यांचं योगदान लाभले.

सेक्रेटरी विजय गुगळे म्हणाले, जैन वात्सल्य संस्थेने गरजूंना मदत करण्यासाठी अखंड सेवा यज्ञ चालवला आहे. या कामात अनेक दानशूर मंडळी स्वेच्छेने योगदान देतात. स्व. चंपालालजी मुथा हे अनेक वर्षांपासून या कार्याशी जोडले गेलेले होते. सर्व गरजूंना चांगल्या प्रतीचे अन्नधान्य व किराणा मिळेल यासाठी ते अतिशय दक्ष असायचे. साधूसंतांची सेवा करण्याची त्यांना आवड होती. समाजातील नवीन पिढीला धार्मिकतेकडे वळवण्यासाठी ते आग्रही असायचे. त्यांनी सामाजिक तसेच धार्मिक कार्यासाठी नेहमीच सढळ हाताने मदत केली. वात्सल्य संस्थेच्या कार्याचा ते आधारस्तंभ होते. शेवटी विजय मुथा यांनी आभार मानले.

अधिकमास पर्वकाळानिमित्त २४ रोजी

## श्री स्वामी समर्थ ७८४ स्तवन मंडल कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– श्री स्वामी समर्थांच्या कृपाशीर्वादाने तसेच प.पू. मुकुंद महेश्वर करंदीकर ऊर्फ नाना यांच्या प्रेरणेतून अधिकमास पर्वकाळानिमित्त रविवारी दि. २४ मे २०२६ रोजी दिवसभर चालणाऱ्या ‘‘श्री स्वामी समर्थ ७८४ स्तवन मंडल’’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८.४५ ते सायंकाळी ७.०० या वेळेत होणाऱ्या या आध्यात्मिक सोहळ्यात स्वामी भक्तांसाठी सामूहिक स्तवन, प्रार्थना, दर्शन व महाप्रसादाचा लाभ उपलब्ध होणार आहे.

अधिकमास हा हिंदू धर्मामध्ये अत्यंत पुण्यदायी आणि आध्यात्मिक साधनेसाठी महत्त्वपूर्ण मानला जातो. या पवित्र पर्वकाळात श्री स्वामी समर्थांच्या नामस्मरणाने व स्तवनाने भक्तांच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा, मानसिक शांती आणि आध्यात्मिक समाधान लाभते, अशी श्रद्धा आहे. या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या ७८४ स्तवन मंडल कार्यक्रमात दिवसभर चार सत्रांमध्ये प्रत्येकी सात स्तवन मंडले पार पडणार असून एकूण ७८४ आवर्तनांचे सामूहिक पठण करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता पहिल्या सत्राने होणार असून सकाळी ९ ते ११.१५ या वेळेत सात स्तवन मंडले म्हणजेच १९६ आवर्तने पूर्ण केली जाणार आहेत. त्यानंतर चहापानाचा अल्पविराम ठेवण्यात आला आहे. दुसऱ्या सत्रात सकाळी ११.३० ते दुपारी १.४५ या वेळेत पुन्हा सात स्तवन मंडलांचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर फराळ मध्यांतर असेल. दुपारी २.१५ ते सायं. ४.३० या वेळेत तिसरे सत्र पार पडणार असून त्यामध्येही १९६ आवर्तनांचे पठण होईल. सायंकाळी चहापानानंतर अंतिम चौथ्या सत्रात सायं. ४.४५ ते ७ या वेळेत शेवटची सात स्तवन मंडले पूर्ण करण्यात येतील. त्यानंतर रात्री ७ ते ९.३० या वेळेत सांघिक प्रार्थना, उत्तरार्ध, दर्शन व महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.या दिव्य आध्यात्मिक सोहळ्यात सहभागी होऊन श्री स्वामी समर्थांच्या कृपेचा व दिव्य अनुभूतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमासाठी श्री दिनेश अ. निसळ (मो. ८६०५३४०९७७), सौ. अलका गंधे तसेच श्री विनीत कावळे (मो. ९८९०३७५७४४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्वामी भक्तांमध्ये या कार्यक्रमाबाबत मोठा उत्साह असून अधिकमासाच्या पुण्यपर्वात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.


# अंतरी....एक काव्य प्रवास मनाचा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर साहित्य क्षेत्राच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण जिल्हा आहे. येथील शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने याहीवर्षी १७ वे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन दि २३ आणि २५ मे रोजी अहिल्यानगरमध्ये संपन्न होत आहे. यानिमित्ताने माझी प्रिय मैत्रीण सुरेखा घोलप यांचा अंतरी हा काव्यसंग्रह प्रकाशित होणार आहे. प्रकाशनापूर्वीच या पुस्तकाने अनेकांची मने जिंकली आहेत.म्हणूनच सहृदय कवयित्री सुरेखा घोलप यांचे खूप खूप अभिनंदन.

दाटून आलेल्या संध्याकाळी अवचित सोनेरी ऊन पडतंशब्दांचं आभाळ ही दाटून आलं कीकविते तुझ सुंदर शिल्प घडतंअसंच काहीसं सुरेखा ताईंच्या कवितेबाबत म्हणावं लागेल. हृदयातली असंख्य दुःखे दाबून धरूनही जेव्हा ओठावर आणि चेहऱ्यावर हसू असतं तेव्हा पाषाण हृदयालाही पाझर फुटत असतो. वैयक्तिक दुःख मनात दाबून सुरेखा ताईंनी आपले मन लेखनात गुंतवले इतकेच नाही तर स्वतःचे पुस्तक प्रकाशित करण्याअगोदर स्वतःच्या मुलगा छोट्या गौरवच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्याच्या गंपूच्या गोष्टी हा कथासंग्रह प्राणपणाने कष्ट घेऊन प्रकाशित केला आणि तितकाच तो यशस्वी झाला.

आई म्हणजे जणू मंदिराची पायरी.. स्वतः कष्ट सोसून लेकाला जणू सरस्वतीचे दर्शन सुरेखा ताईंनी घडवून दिले. अंतरी या त्यांच्या ५१ कवितांच्या प्रथम कविता संग्रहात मनातील विविध भावभावनांची प्रतिबिंबे उमटविणाऱ्या कविता आपल्याला




पाहायला मिळतात.

दगड पडला पाण्यात प्रतिबिंबटच डचमळले अन् तुषार झेलतमी मलाच घेऊन निघाले

या त्यांच्या पहिल्याच कवितेत त्या मनातील वेदना व्यक्त करतात. माणसाच्या आयुष्यात दुःख हे तप्त उन्हाळ्याप्रमाणे असलं तरी आपल्याला गुलमोहोरासारखे फुलता यायला हवं हे त्यांच्या गुलमोहोर या कवितेतून त्या अगदी निर्भयपणे सांगतात. त्याचं फुलणं बघून त्या त्याला प्रश्नही विचारतात हे प्रश्न उदास करत नाही तर माणसाच्या मनात नव चेतना निर्माण करतात. सुरेखाताई त्यांच्या कवितेत पुरोगामी विचारही ठिकठिकाणी पेरतात. त्यांच्या लेकी सावित्रीच्या या कवितेमध्ये वटसावित्रीच्या दिवशी सावित्रीच्या लेकी होऊ, फुल्यांची सावित्री आठवू असं त्या ठणकावून सांगतात. माणूस म्हणून जन्माला आल्यावर जास्त न बघायला मिळणारी गोष्ट म्हणजे माणुसकी, त्या आपल्या कवितेत सांगतात.

माणसांच्या वागण्याच्या वेगवेगळ्या तऱ्हा मध्ये माणुसकी कोठे आहे ? असा प्रश्न त्या विचारतात. दुःखाने होरपळत असलेल्या या कवयित्रीच्या मनात प्रेमही तितकेच भरलेले आहे आणि हेच प्रेम त्या सख्या या कवितेत सख्या तुझे एकटक पाहणे अन् मी घट्ट पापण्या मिटवून घेणे इतके सवयीचे झाले.अशाप्रकारे व्यक्त करतात की कवितेच्या प्रेमात पडल्याशिवाय माणूस राहत नाही.

आपल्या झाड या कवितेतून त्या वाचकांच्या नजरेतही हिरवाईचे स्वप्न पेरतात. श्रावण या कवितेतून ही कवियत्री श्रावणासारखी फुलत राहते. आणि आठवणींचे उमाळे या कवितेतून आपल्यालाही आठवणींच्या जगात घेऊन जाते. मनाने संवेदनशील माणुसकीची जाण असणारी ही कवयित्री दुनियेत वावरताना आपली स्वतःची एक वेगळी नजर ठेवते आणि अंतरीची ही नजर तिच्या अनेक कवितांमधून आपल्याला स्पष्ट जाणवते. अंतरी हे नाव ही खूप भावस्पर्शी आहे.

मन, भावना, गूढता आणि अंतर्मनातील प्रवासाचा सुंदर संगम यात जाणवतो. अंतरी ही निःशब्द भावनांची भाषा आहे. असे मला वाटते.अंतरातून ती बोलते आहे ,तिच्या शब्दांतून तिला क्रांती हवी आहे म्हणून हृदयांतरीच्या कवितांचा हा भावनिक दरवळ अशा अनेक सुंदर कवितांनी नटलेला साहित्य रसिकांनी अनुभवावा.हा काव्यसंग्रह अंतरी खूप सुंदर आहे.आणि प्रत्येकाने वाचावा असा आहे.लेखन सुजाता पुरी यांनी केले आहे.

# गृहउद्योजिका मीरा बेरड यांना ‘परिणीता सन्मान २०२६’ प्रदान

## फूड प्रोडक्ट्सच्या माध्यमातून महिलांना रोजगार; अहिल्यानगरच्या उद्योजिकेचा गौरव स्वयंसहाय्यता समूहातून उभा केला यशस्वी गृहोद्योग; देशविदेशात पोहोचले उत्पादन




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरातील गृहउद्योजिका मीरा बाळासाहेब बेरड यांना खारघर, नवी मुंबई येथे परिणीता सोशल फाऊंडेशनच्या वतीने प्रतिष्ठेचा ‘परिणीता सन्मान २०२६’ प्रदान करण्यात आला. महिला उद्योजकतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या मीरा बेरड यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.

लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर (नवी मुंबई) येथील बॅन्क्वेट हॉलमध्ये झालेल्या भव्य सन्मान सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी चित्रपट निर्मात्या अमृता राव, मानसी इंगळे, मधुराज बिल्डर्सचे मधु पाटील, ईपीआरच्या संचालिका अपर्णा शाह यांच्यासह अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी उपस्थित राहून महिला उद्योजिकांचा गौरव केला.

नगर तालुक्यातील दरेवाडी गावच्या रहिवासी असलेल्या मीरा बेरड यांनी स्वामी समर्थ स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून स्वतःचा ‘अमृत फूड प्रोडक्ट्स’ हा गृहोद्योग सुरू केला. अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून सुरू झालेला हा व्यवसाय आज यशस्वी उद्योगात परिवर्तित झाला आहे. गेल्या पाच वर्षांपासून त्या विविध खाद्यपदार्थांचे उत्पादन करून बाजारपेठेत स्वतःचा वेगळा ठसा उमटवत आहेत.

मीरा बेरड यांनी बचत गटाच्या माध्यमातून उद्योग व्यवसाय उभे केले आहे. या उद्योगामुळे अनेक महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. केवळ रोजगारच नव्हे, तर महिलांना स्वावलंबी बनण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्याचे कामही त्या सातत्याने करत आहेत. त्यांच्या प्रेरणेतून अनेक महिलांनी लघुउद्योग क्षेत्रात पाऊल टाकले असून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा मार्ग स्वीकारला आहे.


‘अमृत फूड प्रोडक्ट्स’ अंतर्गत तयार होणाऱ्या विविध खाद्यपदार्थांना ग्राहकांकडून मोठी पसंती मिळत आहे. अहिल्यानगरसह महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये या उत्पादनांना मागणी असून आता हे पदार्थ देशविदेशातही पाठवले जात आहेत. स्थानिक स्तरावर सुरू झालेला व्यवसाय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचल्याने नगर जिल्ह्याच्या उद्योजकतेला नवी ओळख मिळाली आहे.

कोरोना काळात अनेक महिलांचे उद्योग अडचणीत आले होते. अशा उद्योजिकांना प्रोत्साहन आणि सहाय्य मिळावे या उद्देशाने परिणीता सोशल फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली.

## सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने बँकेच्या योजनांची माहिती व मार्गदर्शनासाठी कॅम्पचे आयोजन

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया कर्ज योजनांचा ग्राहकांनी लाभ घ्यावा- दुबे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– सर्वसामान्य नागरिक, उद्योजक, व्यापारी, नोकरदार, शेतकरी, महिला व युवकांना विविध किरकोळ कर्ज योजनांची माहिती, जनजागृती व मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या प्रादेशिक कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने भव्य ‘‘मेगा रिटेल क्रेडिट आऊटरीच कार्यक्रम २०२६’’ चे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार दिनांक २२ मे २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता संजोग लॉन्स, मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार असल्याची माहिती प्रादेशिक प्रमुख श्री. नरेश कुमार दुबे यांनी दिली.

या कार्यक्रमामध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या विविध आकर्षक व सुलभ कर्ज योजनांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. गृहकर्ज, घर सोलर कर्ज, वाहन कर्ज, शैक्षणिक कर्ज, वैयक्तिक कर्ज तसेच पेन्शन कर्ज आदी योजनांबाबत तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याचा ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आव्हान क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे यांनी केले आहे.

तसेच उपस्थित नागरिकांना तत्काळ कर्ज सल्ला, आर्थिक नियोजनाबाबत मार्गदर्शन आणि विविध योजनांची माहिती देण्यात येणार असून नागरिकांच्या आर्थिक प्रगतीसाठी हा कार्यक्रम उपयुक्त ठरणार असल्याचेही दुबे यांनी सांगितले.

अहिल्यानगर शहर व परिसरातील सर्व नागरिक, ग्राहक, व्यापारी, उद्योजक, महिला व युवकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध कर्ज योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे करण्यात आले आहे.

# सिद्धी फाउंडेशनचा १८ वा रक्तदान महायज्ञ

## महिलांचा उत्स्फूर्त सहभाग ठरला विशेष आकर्षण : २०२६ रक्तदात्यांचा विक्रमी सहभाग




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजसेवा आणि मानवतेचा संदेश देणारा सिद्धी फाउंडेशनचा १८ वा रक्तदान उपक्रम गुरुवार, २१ मे रोजी महावीर प्रतिष्ठान, डी जॅकपुणे येथे अत्यंत उत्साहात पार पडला. सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या भव्य रक्तदान शिबिरात तब्बल २०२६ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण समाजासमोर ठेवला आहे दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक संस्था, युवक, महिला, व्यावसायिक तसेच समाजसेवा आणि मानवतेचा संदेश देणारा सिद्धी फाउंडेशनचा १८ वा रक्तदान उपक्रम गुरुवार, २१ मे रोजी महावीर प्रतिष्ठान, पुणे येथे अत्यंत उत्साहात पार पडला. सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या भव्य रक्तदान शिबिरात तब्बल २०२६ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण समाजासमोर ठेवले.

–गेल्या अठरा वर्षांपासून सातत्याने सुरू असलेला हा उपक्रम आज पुण्यातील एक विश्वासार्ह आणि व्यापक आरोग्यसेवा चळवळ म्हणून ओळखला जात आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक संस्था, युवक, महिला, व्यावसायिक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याच्या कार्यात सहभाग घेतला.

या भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन सिद्धी ग्रुपचे मनोज छाजेड, ललित शिंगवी, मुकेश छाजेड, जिनूभाई लोढा यांच्यासह समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केले. संपूर्ण शिबिरात स्वयंसेवकांची धावपळ, रक्तदात्यांचा उत्साह आणि सामाजिक एकात्मतेचे वातावरण अनुभवायला मिळाले.

उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन यंदाच्या शिबिरात रक्तदात्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. शिबिरस्थळी पुरेशी सावली, नाश्ता व जेवणाची व्यवस्था, प्राथमिक वैद्यकीय तपासणी तसेच विश्रांतीसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. रक्तदान प्रक्रियेदरम्यान कोणालाही त्रास होऊ नये यासाठी स्वयंसेवक आणि वैद्यकीय पथक सतत कार्यरत होते. या उपक्रमामुळे पुणे शहरासह परिसरातील विविध रुग्णालयांना वेळेवर रक्तपुरवठा उपलब्ध होणार असून अनेक गरजू रुग्णांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे. रक्तदानाबरोबरच समाजात आरोग्य, सहकार्य आणि मानवतेचा संदेश पोहोचविणारा हा उपक्रम नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.विशेष म्हणजे संध्याकाळी उशिरापर्यंत रक्तदात्यांच्या मोठ्या रांगा कायम होत्या. वेळेच्या मयदिमुळे अखेर शिबिर बंद करण्याची घोषणा करावी लागली. अनेक नागरिक रक्तदानासाठी उत्सुक असूनही वेळ संपल्याने त्यांना परत जावे लागले.

या रक्तदान शिबिराला विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भेट देत उपक्रमाचे कौतुक केले. प्रमुख उपस्थितांमध्ये रोहितदादा पवार, हेमंत रासने, श्रीनाथ भिमाले यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच डीसीपी मिलिंद मोहिते, डीसीपी अमोल झेंडे, डीसीपी ए. राजा यांच्यासह पोलीस अधिकारी व विविध शासकीय अधिकाऱ्यांनी शिबिराला भेट देत रक्तदात्यांचे आणि आयोजकांचे कौतुक केले. विजयकांत कोठारी, ॲड. एस के जैन, विजय भंडारी, राजेश साकला, विलास राठोड यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्व समाजातील अनेक गणमान्य व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘सोलर सिस्टिम ही आता काळाची गरज’ – आ. संग्राम जगताप

## टिळक रोड येथे ‘रुद्र एंटरप्राइजेस सोलर सिस्टिम’ दालनाचे उद्‌घाटन । प्रधानमंत्री सूर्योदय योजनेच्या माध्यमातून नागरिकांनी सौरऊर्जेकडे वळावे – आ. अक्षय कर्डिले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सौरऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबविल्या जात असून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सोलर सिस्टिमचा स्वीकार करणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री सूर्योदय योजनेच्या माध्यमातून नागरिकांना आर्थिक मदत आणि अनुदान दिले जात आहे. त्यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांनी सोलर शेती पंप, घरगुती वीज निर्मिती तसेच विविध सौरऊर्जा सुविधांकडे वळावे. सोलर सिस्टिम ही आता काळाची गरज बनली असून जास्तीत जास्त नागरिकांनी सौरऊर्जेचा वापर करून विजेची बचत करावी, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

टिळक रोड येथे ‘रुद्र एंटरप्राइजेस सोलर सिस्टिम’ दालनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आमदार अक्षय कर्डिले, नगरसेवक मनोज कोतकर, माजी नगरसेवक संभाजी पवार, दरेवाडीचे सरपंच अनिल करांडे, वाळकीचे सरपंच शरद बोठे, बाजार समितीचे माजी सभापती अभिलाष घिगे, स्वामी मोबाईलचे संदीप पडोळे, रंगनाथ निमसे, अनिल बोठे, संचालक राहुल घुसळे, सौरभ खेडकर आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार अक्षय कर्डिले म्हणाले की, ‘‘देशामध्ये ऊर्जा बचत आणि पर्यावरण संरक्षणासाठी सौरऊर्जा अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. केंद्र शासनाने प्रधानमंत्री सूर्योदय योजना सुरू करून सामान्य नागरिकांपर्यंत सौरऊर्जेचा लाभ पोहोचवण्याचे काम केले आहे. आज अनेक शेतकरी सोलर शेती पंपाच्या माध्यमातून विजेवरील खर्च कमी करत आहेत. घरगुती सोलर प्रकल्पामुळे नागरिकांना दीर्घकालीन आर्थिक बचत होत आहे. भविष्यात पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून सौरऊर्जेकडे वळणे ही काळाची गरज आहे.

ते पुढे म्हणाले की, ‘‘अहिल्यानगरसारख्या शहरांमध्ये सोलर सिस्टिम व्यवसायाला मोठी संधी आहे. स्थानिक स्तरावर अशा उद्योगांची उभारणी झाल्यास युवकांना रोजगार उपलब्ध होईल आणि नागरिकांना आधुनिक तंत्रज्ञानाची सुविधा आपल्या शहरातच मिळेल. पर्यावरणपूरक विकासासाठी सौरऊर्जा हा सर्वोत्तम पर्याय असून प्रत्येक घर आणि उद्योगांनी सोलरचा वापर वाढवावा.

रुद्र एंटरप्राइजेसचे संचालक राहुल घुसळे म्हणाले की, ‘‘रुद्र एंटरप्राइजेस सोलर सिस्टिमच्या माध्यमातून ग्राहकांना विविध सौरऊर्जा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या माध्यमातून नागरिकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक बचत होणार आहे. सोलर वॉटर हीटर, सोलर स्ट्रीट लाईट, सोलर वॉटर पंप, सोलर इन्व्हर्टर यांसह विविध प्रकारच्या सोलर सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. दर्जेदार सेवा आणि योग्य मार्गदर्शन देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

# आपले स्टार्ट–अप आणि उद्योजकीय ऊर्जेचा प्रभावी वापर करत, आपला ठसा उमटवणाऱ्या एस्सेल समूहाची रोमांचक १०० वर्षे पूर्ण

## १९२६ मध्ये स्थापन झालेल्या एस्सेल ग्रुपने पॅकेजिंग, अम्युझमेंट पार्क्स, घरगुती मनोरंजन, बातम्या, कन्टेन्ट, पायाभूत सुविधा, स्थावर मालमत्ता, शिक्षण, तंत्रज्ञान, लाइफस्टाइल आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटवत भारतीय व्यावसायिक विश्वात महत्त्वाचे स्थान पटकावले आहे.

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बहुआयामी भारतीय व्यावसायिक समूह एस्सेल ग्रुपने गौरवशाली १०० वर्षे पूर्ण करून आपल्या प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. १९२६ मध्ये आदमपूर नावाच्या एका छोट्या शहरात झालेल्या सुरुवातीपासून ते विविध व्यवसायांमध्ये विस्तारलेल्या बहुआयामी समूहापर्यंत, एस्सेल ग्रुपने जगभरात एक कायमस्वरूपी ठसा उमटवला आहे.

१९६७ पासून, एस्सेल ग्रुपने एका पारंपरिक व्यवसायातून स्टार्ट–अपमध्ये स्वतःला रूपांतरित करत जागतिक समूहामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले आणि स्वतःला नव्याने घडवले आहे. ग्रुपच्या मुळातील पारंपरिक वस्तूंच्या व्यापाराचा व्यवसाय लष्करी पुरवठा आणि सीमेपलीकडील व्यापाराकडे वळवण्यात आला. विशेष म्हणजे, अनेक व्यवसायांची सुरुवात ही या ग्रुपने केली असून, उद्योगातील अनेक गोष्टींची सुरुवात ही त्यांच्या नावावर आहे. महत्त्वाचे म्हणजे आपली स्टार्ट–अप मानसिकता जोपासत आणि नफ्यावर बारकाईने लक्ष केंद्रित करत, ज्या व्यवसायांनी अपेक्षित मूल्य–वितरणाची पातळी गाठली नाही, असे काही व्यवसाय बंद करण्यास ग्रुपने कधीही मागेपुढे पाहिले नाही.

स्वर्गीय राम गोपाल जी यांनी स्थापन केलेला, त्यांचे सुपुत्र श्री जगन्नाथ जी गोएंका यांनी विस्तार केलेल्या या व्यवसायाला श्री. नंद किशोर जी यांनी भक्कम पाठिंबा दिला. दूरदृष्टी लाभलेल्या डॉ. सुभाष चंद्र आणि त्यांचे बंधू लक्ष्मी नारायण, जवाहर आणि अशोक गोयल यांनी यशस्वीपणे नेतृत्व केलेला एस्सेल ग्रुप हा मोजक्याच भारतीय व्यावसायिक समूहांपैकी एक आहे, जो आपली समृद्ध परंपरा सहाव्या पिढीकडे यशस्वीपणे हस्तांतरित करत आहे आणि विशेष म्हणजे, या समूहाची चौथी आणि पाचवी पिढी आजही सक्रिय आहे.

गेल्या शतकादरम्यान, या समूहाने पॅकेजिंग, गृह मनोरंजन, मनोरंजन उद्याने, वृत्तसेवा, आशय वितरण, पायाभूत सुविधा, स्थावर मालमत्ता, शिक्षण, तंत्रज्ञान, जीवनशैली आणि अशा विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये आपला विस्तार केला; ज्यामुळे १९० हून अधिक देशांमधील अब्जावधी लोकांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडला आहे. केवळ उदारीकरणापूर्वीच्या काळात भारतीय व्यावसायिक क्षेत्राची उभारणी करण्यातच या समूहाने योगदान दिले नाही, तर देशाचे भौतिक सामर्थ्य आणि सॉफ्ट पॉवर म्हणजेच सांस्कृतिक व सामाजिक प्रभाव लक्षणीयरीत्या वाढवून देशाच्या आर्थिक विकासालाही बळकटी दिली आहे. केवळ काही कंपन्याच नव्हे, तर संपूर्ण उद्योगक्षेत्रे उभी करणाऱ्या आपल्या पथदर्शी उपक्रमांच्या माध्यमातून, एस्सेल समूहाने आपल्या शतकातील वाटचालीचा ठसा उमटवला आहे; आणि या प्रक्रियेत त्यांनी देशभरातील १ कोटींहून अधिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत.

या विशेष प्रसंगी डॉ. सुभाष चंद्र म्हणाले, ‘‘एस्सेल ग्रुपचा प्रवास हा चिकाटी, लवचिकता, नावीन्य आणि प्रगतीचा राहिला आहे. व्यावसायिक प्रगती ही समाजासाठी आणि राष्ट्रासाठी मूल्यवर्धक ठरली पाहिजे, या आमच्या विश्वासानेच ग्रुपने व्यवसायाच्या प्रत्येक क्षेत्रात उचललेल्या महत्त्वपूर्ण पावलांना मार्गदर्शन केले आहे. मला आणि माझ्या बंधूंना १०० वर्षांचा हा महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करताना अत्यंत अभिमान वाटतो. पिढ्यानपिढ्यांची दूरदृष्टी आणि अज्ञात क्षेत्रात पाऊल ठेवण्याच्या धैर्यातूनच हा टप्पा उभारला गेला आहे, ज्यामुळे जवळपास प्रत्येक उद्योगच खऱ्या अर्थाने शतकपूर्तीचा ठसा उमटवतो आहे. आपल्या राष्ट्रासोबतच एस्सेल ग्रुपचा विकास झाला आहे आणि मला हे सांगताना अभिमान वाटतो की, आपण सर्वांनी मिळून आर्थिक मूल्य निर्माण केले आहे आणि राष्ट्रीय प्रगतीला चालना देण्यासाठी सामाजिक परिवर्तन सक्षम केले आहे.’’

हा महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करत, डॉ. चंद्रा यांनी आज आयोजित केलेल्या एका विशेष टाऊनहॉलमध्ये एस्सेल ग्रुपच्या जगभरातील १०,००० हून अधिक कर्मचाऱ्यांना संबोधित केले. या अत्यंत अनौपचारिक वातावरणात डॉ. चंद्रा यांनी ग्रुपच्या ऐतिहासिक प्रवासावर प्रकाश टाकला आणि हा समृद्ध वारसा पुढे नेण्यात तसेच व्यवसाय भक्कमरित्या उभारण्यात कर्मचाऱ्यांनी बजावलेल्या मोलाच्या भूमिकेची दखल घेतली. आपल्या भाषणात, डॉ. चंद्रा यांनी ग्रुपने आपल्या उत्पादनांच्या माध्यमातून जगभरात व्यापक सकारात्मक प्रभाव निर्माण करण्यात दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकला. अनेक दशकांपासून ग्रुपच्या प्रवासाचा भाग असलेल्या कर्मचाऱ्यांनी सांगितलेल्या हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी कथाही त्यांनी सांगितल्या. भारतातील पहिली स्टार्टअप कंपनी म्हणून, एस्सेल ग्रुप भविष्यासाठी नवनवीन शोध लावत आणि धाडसी पावले उचलत असल्याचा पुनरुच्चार डॉ. चंद्रा यांनी केला. तसेच, पुढील शतकाचे निर्माते म्हणून उद्योजकतेची भावना जोपासण्याचे आवाहन त्यांनी कर्मचाऱ्यांना केले.

गेल्या १०० वर्षांत, या समूहाच्या योगदानाने भारताच्या आर्थिक आणि सामाजिक पटलावर एक अमिट ठसा उमटवला आहे.

नव्याने सुरुवात केलेल्या काही उपक्रमांच्या माध्यमातून, या समूहाने राष्ट्रनिर्मितीचा एक भक्कम पाया रचला आहे:

नावीन्यपूर्ण पॅकेजिंग तंत्रज्ञानाची भारतात सुरुवात

एस्सेल प्रोपॅकच्या माध्यमातून एस्सेल समूहाने भारतात ग्राहक–वस्तूंच्या आधुनिक पॅकेजिंग तंत्रज्ञानाचा परिचय करून दिला. या कंपनीने सर्वप्रथम लॅमिनेटेड प्लास्टिक ट्यूब तंत्रज्ञानाचा अवलंब केला; ज्यामुळे पाचही खंडांमध्ये उत्पादन प्रकल्प उभारून, जगातील सर्वात मोठी लॅमिनेटेड ट्यूब उत्पादक कंपनी म्हणून तिला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आणि ती भारताची पहिली बहुराष्ट्रीय कंपनी ठरली. जोपर्यंत ही कंपनी एस्सेल समूहाचा भाग होती, तोपर्यंत या कंपनीने उत्पादित केलेल्या ट्यूब्सचा वापर जगातील एक तृतीयांश लोकसंख्या दात घासताना करत असे.

सामूहिक मनोरंजनाच्या अनुभवाच्या गरजेची जाणीव

लोकांना एकत्र आणणाऱ्या आणि अर्थपूर्ण सहभाग सुनिश्चित करणाऱ्या, सामूहिक मनोरंजनाच्या अनुभवांची वाढती पण अपूर्ण राहिलेली गरज ओळखून, या समूहाने आशियातील सर्वात मोठे अम्युझमेंट पार्क एस्सेल वर्ल्ड सुरू केले. या उद्यानाने संपूर्ण आशिया खंडातील मोकळा वेळ घालवण्याची आणि पर्यटन अनुभवांची संकल्पना नव्याने परिभाषित केली. तसेच पायाभूत सुविधा, पर्यटन आणि आतिथ्य या क्षेत्रांना गती देऊन, राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देण्यास त्यांना सक्षम केले.

भारतातील लहान मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राचे एका उद्योगात रूपांतर करून आणि त्याला आयटी क्षेत्रानंतर दुसरे सर्वात मोठे रोजगार देणारे क्षेत्र बनवणे १९९२ मध्ये देशातील पहिले खासगी सॅटेलाइट टेलिव्हिजन चॅनल झी टीव्हीची स्थापना करून एस्सेल ग्रुपने भारतीय मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राच्या परिवर्तनाची सुरुवात केली; त्यानंतर १९९५ मध्ये भारतातील पहिली खासगी वृत्तवाहिनी झी न्यूज सुरू केली. या अग्रगण्य प्रयत्नांमुळे माहिती आणि मनोरंजनाची उपलब्धता सर्वांसाठी सुलभ झाली, आणि समृद्ध परंपरा तसेच मूल्यांनी युक्त भारतीय मनोरंजन जगभरात पोहोचले, ज्यामुळे भारताचे जागतिक नकाशावर भक्कम स्थान निर्माण झाले. या ग्रुपने सामग्री निर्मिती, जाहिरात, वितरण, निर्मिती, इमर्सिव्ह इन्फोटेनमेंट (मनोरंजक माहिती आणि मनोरंजन) या क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व संधी निर्माण केल्या आणि वापराच्या नव्या डिजिटल पद्धती विकसित केल्या.

या ग्रुपने पुढे या क्षेत्रात गुंतवणूक करून सिटी केबल आणि डिश टीव्हीच्या माध्यमातून एक यशस्वी वितरण व्यवसाय स्थापित केला, ज्यामुळे घरोघरी सामग्री पोहोचवण्याच्या पद्धतींमध्ये क्रांती घडली आहे. ग्रुपने उचललेल्या पावलांमुळे भारतीय मीडिया आणि मनोरंजन उद्योग उदयोन्मुख बाजारपेठांमधील गुंतवणूकदारांसाठी सर्वात आकर्षक क्षेत्रांपैकी एक बनला आहे आणि हे क्षेत्र चार दशके पूर्ण करण्याच्या जवळ पोहोचत असतानाही लक्षणीय थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करत आहे.

दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातून पुढील पिढीचे संगोपन

देशाचे भविष्य घडवण्यासाठी शिक्षण हे सर्वात शक्तिशाली साधन आहे, या विश्वासाने प्रेरित होऊन, ग्रुपने झी लर्नच्या माध्यमातून वाढत्या निमशहरी आणि ग्रामीण लोकसंख्येला परवडणारे आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिले आहे. भावी पिढ्यांचे संगोपन करण्यासाठी, ग्रुपच्या २५०० हून अधिक किडझी ब्रँडेड प्री–स्कूल्स आहेत, ही आशियातील सर्वात मोठी साखळी ठरली आहे आणि ती लाखो मुलांच्या जीवनावर प्रभाव टाकते. यासोबतच, तरुणांच्या अद्वितीय कौशल्यांचे संगोपन करणाऱ्या के–१२ शाळा आणि उच्च शिक्षण संस्थाही आहेत. भारतातील शिक्षण क्षेत्रात जवळपास १५ दशलक्ष लोकांना रोजगार मिळतो, ज्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी नवनवीन संधी निर्माण होतात.

शहरी आधुनिकीकरणाच्या पायाभूत सुविधांची उभारणी

राष्ट्र उभारणीत योगदान देणाऱ्या महत्त्वपूर्ण शहरी पायाभूत सुविधांच्या उभारणीत एस्सेल ग्रुपच्या पायाभूत सुविधा व्यवसायाने मोठे योगदान दिले. राज्य आणि राष्ट्रीय महामार्ग, शहरी जल व्यवस्थापन प्रणाली ते वीज वितरण नेटवर्कपर्यंत, या ग्रुपने अनेक राज्यांमध्ये कनेक्टिव्हिटी तसेच राहणीमानाचा दर्जा सुधारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, ज्यामुळे मोठ्या आर्थिक विकासाला चालना मिळाली.

राष्ट्र विकासाच्या पुढील टप्प्याला अर्थसाहाय्य

या ग्रुपसाठी यशाचा अर्थ केवळ नफा नाही तर नफ्याच्या पलीकडे जाऊन, आपल्यासारख्याच उद्योजकांसाठी संधी निर्माण करून संपूर्ण उद्योग उभारणे हा आहे. एस्सेल फायनान्सच्या माध्यमातून, या ग्रुपने लघु आणि मध्यम उद्योगांना () वित्तीय सेवा पुरवून आणि देशभरातील कंपन्यांना पाठिंबा देण्यासाठी सुरक्षित कर्ज आणि क्रेडिट लाइन्स उपलब्ध करून देऊन भारतीय अर्थव्यवस्थेत योगदान दिले.

समूहाचे सामाजिक भान

विविध समुदायांमध्ये सकारात्मक सामाजिक–सांस्कृतिक प्रभाव निर्माण करण्याच्या उद्देशाने अनेक सामाजिक उपक्रम हाती घेऊन, या समूहाने व्यवसायाच्या पलीकडे जात महत्त्वपूर्ण मूल्यनिर्मिती केली आहे. एकल विद्यालय, ग्लोबल विपश्यना फाउंडेशन आणि सुभाषचंद्र फाउंडेशन यांनी समाजासाठी दिलेले योगदान हे समाजात चिरस्थायी आणि सकारात्मक प्रभाव निर्माण करण्याच्या समूहाच्या कटिबद्धतेचे ठाम प्रतिबिंब आहे. देशभरातील शेकडो गावांमध्ये ग्रामीण युवक आणि महिलांना सक्षम करण्याचे कार्य सुभाषचंद्र फाउंडेशन अविरतपणे करत आहे.

भारतातील युवकांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या ‘‘सुभाषचंद्र मोटिव्हेशनल शो‘‘ व्यतिरिक्त, भविष्यासाठी आणखीही अनेक सामाजिक उपक्रम नियोजित आहेत.

एस्सेल ग्रुपची भविष्यातील १०० वर्षे

भारताचा स्वतःचा स्टार्टअप म्हणून, एस्सेल ग्रुप नवीन व्यवसाय क्षेत्रांमध्ये विस्तार करून आणि कंटेंट, तंत्रज्ञान तसेच डिजिटल क्षेत्रात वाढीव क्षमतांसह भविष्यासाठी उभारणी करून आपल्या उद्योजकतेचा विस्तार करते आहे. तंत्रज्ञान हे ग्रुपसाठी मुख्य लक्ष्य क्षेत्र असेल, ज्याद्वारे सध्याच्या व्यवसायांसाठी त्याच्या खऱ्या क्षमतेचा अधिक उपयोग केला जाईल. सर्वसमावेशक, भविष्यासाठी सज्ज असे प्लॅटफॉर्म ग्रुप तयार करत आहे, ज्यात लोकांचा सहभाग असेल, तो टिकवून ठेवला जाईल आणि त्याचे दीर्घकालीन मूल्यात रूपांतर करू शकतील, तसेच अटेंशन इकॉनॉमीमध्ये एक महत्त्वपूर्ण वाटा मिळवू शकतील. ग्रुपचा भविष्यासाठीचा दृष्टिकोन भारताच्या विकासाच्या महत्त्वाकांक्षेशी पूर्णपणे जुळलेला आहे, ज्याद्वारे नावीन्यपूर्णतेला चालना देणे आणि अशा संधी निर्माण करणे अपेक्षित आहे, ज्या जागतिक नकाशावर राष्ट्राच्या आर्थिक आणि सांस्कृतिक उत्क्रांतीचा पुढील टप्पा निश्चित करतील.

# पैठणमध्ये गोवंश कत्तल प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल


## बेकायदेशीर गोमांस विक्री; ३.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पैठण शहरातील जोहरी वॉर्ड परिसरात बेकायदेशीररीत्या गोवंश जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री केल्याप्रकरणी पैठण पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ३ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी पोहेका अनिल अभिमान गायकवाड (वय ४१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोहेल शकील कुरेशी (वय २२) व अजीज सलीम कुरेशी (वय ३६, दोघे रा. कुरेशी मोहल्ला, पैठण) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरनं १५६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेचे कलम ३२५, ३(५) तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ आणि प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.



२२ मे रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास जोहरी वॉर्ड येथील दुकानासमोर ही कारवाई करण्यात आली. आरोपींकडे जनावरांच्या कत्तलीचा कोणताही वैध परवाना नसताना गोमांस विक्री सुरू असल्याचे आढळून आले. तसेच गोवंश जनावरांना चारा–पाण्याची सोय न करता आखूड दोरीने बांधून ठेवल्याचेही निदर्शनास आले.

या कारवाईत अंदाजे ११५ किलो गोमांस, विविध जातींची गोवंश जनावरे, कत्तलीसाठी वापरण्यात येणारे सुरे, कुऱ्हाड, मस्कला तसेच वजन काटा असा एकूण ३ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, आरोपींवर यापूर्वीही मारहाण व इतर गुन्ह्यांची नोंद असल्याची माहिती पोलिसांनी दिली. प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि खाडे करीत आहेत.

(पान १ वरून)

## ‘नो व्हेईकल डे’ला उत्स्फूर्त प्रतिसाद सायकलवर व पायी आले अधिकारी

कर्मचाऱ्यांनी इंधन बचतीसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी ‘‘एक कर्मचारी एक वृक्ष दत्तक’’ ही संकल्पनाही मांडण्यात आली. आगामी पावसाळ्यात केवळ वृक्षारोपण न करता प्रत्येक कर्मचाऱ्याने लावलेले झाड जगविण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच शासकीय कार्यालय परिसर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

कर्मचाऱ्यांचा ताणतणाव कमी करण्यासाठी दर महिन्याला सायकल रॅली, ट्रेकिंग, योग, ध्यानधारणा व सुदर्शन क्रिया सत्रांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

या उपक्रमाला मा. जिल्हाधिकारी, मा. अप्पर जिल्हाधिकारी, मा. निवासी उपजिल्हाधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी सक्रिय पाठिंबा दिला. वरिष्ठ अधिकारी स्वतः सहभागी झाल्याने कर्मचाऱ्यांनीही मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.

या प्रसंगी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सरचिटणीस रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष अशोक अलका सूर्यभान मासाळ, महिला जिल्हाध्यक्षा सौ. वंदना नेटके यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## दुचाकीस्वार तरुणीचा पाठलाग करून विनयभंग करणारा जेरबंद

त्याचे नाव कळवा, असे आवाहन केले होते.

दिनांक २० रोजी रात्री नऊ ते ११ च्या सुमारास ही तरुणी मैत्रिणीला भेटून मोपेड दुचाकीवर व्ही–स्टार हॉटेलसमोरील रोडवरून घरी जात असतांना एक अनोळखी व्यक्तीने तिचा मोटारसायकलवरुन पाठलाग सुरू केला. हातवारे करुन व बोलून लज्जा उत्पन होईल असे कृत्य केले होते. तिच्यासोबत घडत असलेल्या प्रकाराचा तरुणीने तिच्या मोबाईलमध्ये व्हिडीओ तयार करून इंस्टाग्रामवर व्हायरल केला व व्हिडिओमधील इसमास कोणी ओळखत असेल तर त्याचे नाव कळावा असे आवाहन केले होते

पोलीस अधीक्षकांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन व्हिडीओमधील इसमास तात्काळ ताब्यात घेण्याच्या सूचना केल्या. त्यानुसार एलसीबीच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे बंटी उर्फ संकेत ससाणे यास ताब्यात घेतले. बंटीने या तरुणीसारखाच प्रकार आणखी एका ठिकाणी केल्याचे पुढे आले आहे. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७८,७९ प्रमाणे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.